CMYK

## ऑलिम्पिक : बॅडमिंटन अन् टेबल टेनिसमध्ये भारतीय खेळाडूंची विजयी सुरुवात

**नवी दिल्ली :** भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने पॅरिस ऑलिम्पिकमधील आपल्या मोहिमेला विजयाने सुरुवात केली. लक्ष्यने पुरुष एकेरीच्या लढतीत केविन कॉर्डनचा २१-८, २२-२० असा पराभव करून विजयी सुरुवात केली. एल गटातील सामन्यात लक्ष्याची जागतिक क्रमवारीत ४१व्या क्रमांकाची खेळाडू कॉर्डनविरुद्धची कामगिरी दमदार होती. मात्र, ग्वाटेमालाच्या खेळाडूने दुसऱ्या गेममध्ये जागतिक क्रमवारीत १८व्या स्थानावर असलेल्या लक्ष्याविरुद्ध लढण्याचा प्रयत्न केला. परंतु अखेरीस लक्ष्यने पुनरागमन करत हा गेम एकतर्फी जिंकला. वर्ल्ड चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेता लक्ष्य सेनचा गटातील त्याच्या दुसऱ्या सामन्यात बेल्जियमच्या ज्युलियन कारागीशी सामना होईल.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## आरक्षणाला धक्का लागल्यास राजकारणातून संन्यास घेणार : प्रफुल्ल पटेल यांचे मोठे वक्तव्य


**भंडारा :** आरक्षणाला जर धक्का लागेल तर मी शंभर टक्के राजकारणातून संन्यास घेणार. कारण त्यावेळी मला कुठल्याही पदावर आणि राजकारणात राहण्याचा कोणताही अर्थ नाही, म्हणूनच मी त्याग करेल, असं गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रस अजित पवार गटाचे नेते आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केलं आहे. या देशात आरक्षण, हे संविधानात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेलं आहे. त्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही. त्याचा मूळ ढाचा कोणीही बदलू शकत नाही. आमच्यासारखे अनेक लोक जे संसदेत संविधानाची शपथ घेऊन बसलेली आहेत, ते असं होऊ देणार नाही. असं स्पष्ट वक्तव्य पटेल यांनी केलंय. ते भंडाऱ्यात बोलत होते.

www.surajyadigital.com । रविवार, दि. २८ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २९९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

**ॲड. प्रकाश आंबेडकर कडाडले**

# फडणवीस-जरांगे यांचे भांडण नकली, राजकारण लक्षात घ्या, फसू नकात

## राजकीय चेहरा नसेल तर ओबीसी आरक्षण वाचणार नसल्याचा इशारा



**सुराज्य/सोलापूर**

आरक्षण बचाव यात्रा घेवून राज्यभर दौऱ्यावर असलेले वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड.प्रकाश आंबेडकर हे शनिवारी सोलापूर आणि पंढरपूरच्या दौऱ्यावर आले होते.दोनही ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या आणि वार्ताहर परिषद घेतली. आरक्षणाच्या संदर्भात बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि काँग्रेसपक्ष यांच्यावर कडाडून हल्ला चढवला.मराठा आणि ओबीसींच्या आरक्षणावरून फडणवीस आणि जरांगे यांच्यात उठसूठ जे भांडण सुरू आहे ते नकली आहे. जनतेने राजकारण लक्षात घ्यायला हवे त्यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे असल्याची खरमरीत टीका आंबेडकरांनी केली.राजकीय चेहरा नसेल तर ओबीसी आरक्षण धोक्यात येईल,असा इशाराही त्यांनी दिला.

मराठा आणि ओबीसीच्या आरक्षणावरून राज्यात सध्या घमासान सुरू आहे.जरांगे यांच्याकडून फडणवीसांवर टीका-आरोप होत आहे तर फडणवीस हे कूटनीतीतून जरांगेंना शांत करण्याचा प्रयत्न करत आहेत.मराठा समाजाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आले पाहिजेत,या शरद पवारांच्या विधानाला आंबेडकरांनी जोरदार हरकत घेतली होती.या साऱ्या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी आरक्षण बचाव यात्रा सुरू केली आहे.ही यात्रा पंढरपूरला आली.त्यानंतर सोलापुरातही सायंकाळी यात्रेचे आगमन झाले.

आंबेडकर म्हणाले की,ओबीसींचे १०० आमदार विधानसभेत जायला हवे आहेत. १०० आमदार जर विधानसभेत गेले तर कोणताही ठराव ओबीसींच्या विरोधात मंजूर होत नाही हे लक्षात घ्या. ही लढाई राजकीय लढाई आहे. भारतीय जनता पक्षाने जर ओबीसींची बाजू घेतली आणि जरांगेनी भाजपवर टीका केली तर मी समजू शकतो की, हे भांडण आहे. पण फडणवीस आणि त्यांच्या पक्षाने भूमिका घेतली नाही. तरीही जरांगे हे फडणवीस यांना टार्गेट करत आहेत. राजकारण लक्षात घ्या. यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत.

ओबीसींनी राजकीय चेहरा दाखवला नाही, तर आरक्षण वाचणार नाही. ज्या दिवशी आपण आपला राजकीय चेहरा दाखवू, तेव्हाच आपण आरक्षण टिकवू, असे आंबेडकर यांनी पंढरपूर येथील सभेत म्हणाले. मिळालेले अधिकार टिकवणे जसे महत्वाचे आहे, तसे ओबीसी म्हणून ओळख टिकवणे हे सुद्धा महत्वाचे आहे,या बाबींकडेही त्यांनी लक्ष वेधले.

### काँग्रेसलाही धुतले

आंबेडकर यांनी काँग्रेसवरही टीका केली. ते म्हणाले की, एससी आणि एसटीप्रमाणे ओबीसींचे आरक्षण संविधानिक असावे अस मला वाटत होते. त्सासाठी ओबीसींची सूची ही घटनेचा अंतर्भाग करायची होती. त्यावेळचे दोन पक्ष म्हणजे काँग्रेस आणि भाजप यांच्याशी बोलण्यासाठी दोन समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यातील काँग्रेससोबत बोलण्यासाठीच्या समितीत मी सुद्धा होतो. तेव्हा काँग्रेसवाल्यांना मी म्हणालो की, हे झाले पाहिजे तेव्हा काँग्रेसने सरळ सांगितले की, आम्हाला यामध्ये रस नाही. मी जसं म्हणालो ओबीसी हा भाजपबरोबर आहे. आज जर तुम्ही बघितलं असेल की, ओबीसी जरांगे पाटलांच्या भूमिकेला कुठेही विरोध करत नाही. आपण राजकारण समजून घेतलं पाहीजे. जरांगे फडणीसांना शिव्या देताय, लोकांना वाटते, जरांगे आणि फडणवीस यांच्यात भांडण झाले. पण मला वाटते, हे नकली भांडण आहे.' असेही आंबेडकर म्हणाले.

### तुम्ही फसू नका

तुम्ही अजून स्वत:ला फसवून घेवू नका. राजकारण समजा. दाखवायचे दात एक अन् खायचे दात वेगळे. तुम्ही सांगितले पाहिजे, दाखवायचे दात आणि खायचे दात एकच असले पाहिजे, तरच मत मागायला ये नाहीतर अजिबात मत मागायला येवू नकोस. म्हणून उद्याच्या असणाऱ्या या कालावधीत आपल्याला शांतत राखायची आहे. जे राजकीय मत आहे, ते राजकीय मत राहिले पाहिजे ते सामाजिक मत होता कामा नये. गावामध्ये वाद होणार नाही, याची आपण दक्षता घेतली पाहिजे आणि ती दक्षात घेत आपण आरक्षण वाचवू या एवढच मी आपल्याला आवाहन करतो,अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

# विसर्ग घटल्याने उजनीच्या शंभरीला लागला ब्रेक

**सुराज्य/सोलापूर**

दौंडमधून शुक्रवारी मोठ्या प्रमाणात विसर्ग येवू लागल्यानंतर उजनी धरणातील पाण्याच्या पातळीची शंभरीकडे वाटचाल होण्याची चिन्हे दिसत होती मात्र शनिवारी येणाऱ्या विसर्गात मोठी घट झाली.सायंकाळी सहाच्या आकडेवारीनुसार दौंडमधून केवळ ३७ हजार३२० क्युसेकचा विसर्ग येत होता.पुणे जिल्ह्यासह उजनीच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस थांबला आणि पुण्यातील पूरही ओसरला. त्याचा हा परिणाम असल्याचे सांगण्यात आले

शुक्रवारी दौंडमधून एक लाखापेक्षा अधिक विसर्ग दौंडमधून येत होता.शुक्रवारी सकाळीच उजनीने प्लसची बॉन्ड्री पार करून शंभरीकडे जाण्याची तयारी सुरू केली होती.दौंडचा विसर्ग असाच कायम राहिला तर १५ ऑगस्टपर्यंत उजनी शंभरी गाठू शकेल,असा अंदाजही वर्तवण्यात होता मात्र सोलापूर जिल्हावासियांची ही अपेक्षा पूर्ण होवू शकली नाही.शनिवारी उजनी प्लस ३१ टक्क्यांवर होती.दौंडचा विसर्ग पाहाता पाण्याची पातळी ५० टक्के होईल,अशीही शक्यता वर्तवण्यात आली.



### अजून आशा कायम

पावसाळा अजून दोन महिने आहे.यापुढे पडणाऱ्या नक्षत्रांचा पाऊस मोठा असतो.त्यामुळे उजनी शंभरी निश्चित गाठेल,असा विश्वासही व्यक्त केला जात आहे.




# महायुतीची जागा वाटणीची, पवारांची एकी टिकवण्याची

**प्रतिनिधी/मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या बोहल्यावर चढण्याची लगीनघाई राजकारण्यांमध्ये सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.महायुतीला जागा पदरात पाडून घेण्याची तर शरदरावांची महाविकास आघाडी टिकवण्याची लगीनघाई सुरू झाली आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला जागावाटपात झालेल्या विलंबाचा फटका बसला. जागांसाठी झालेली रस्सीखेच, उमेदवार जाहीर करण्यास झालेला उशीर, प्रचारासाठी अपुरा पडलेला वेळ यामुळे महायुती पिछाडीवर पडली.

लोकसभेवेळी झालेली चूक विधानसभेला टाळण्याचा महायुतीचा प्रयत्न आहे. महायुतीमध्ये सर्वात उशिरा सामील झालेले अजित पवार जागावाटप लवकर करण्यासाठी सर्वाधिक आग्रही असल्याचे समजते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दोन उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत गुरुवारी रात्री उशिरा वर्षा बंगल्यावर जागावाटपाबद्दल चर्चा झाली.त्यातील गुपित शनिवारी उघड झाले.

### दोन्ही उपमुख्यमंत्री तातडीने दिल्लीला

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नीती आयोगाच्या बैठकीसाठी शुक्रवारी दिल्लीत होते. त्यांच्यानंतर शनिवारी सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हेही दिल्लीत दाखल झाले.नीती आयोगाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांसह दोनही उपमुख्यमंत्र्यांनी भाजप नेते अमित शहा यांची भेट घेतल्याचे वृत्त आहे. शहा यांच्याशी झालेल्या चर्चेत महायुतीमधील तीनही पक्षाच्या वाट्याला किती जागा येतील आणि कोण कोठच्या जागा लढविणार, याबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचे माहीतगार सांगतात.

### अजितदादा मात्र सावध

शरद पवारांनी अजित पवारांना लोकसभेला दिलेला शह पाहता दादा गटात चलबिचल सुरु आहे. त्यांचे काही आमदार शरद पवार गटाच्या संपर्कात आहेत. शरद पवारांनी लोकसभेला उमेदवार देताना केलेल्या खेळी पाहता अजित पवार गटाचे आमदार फुटण्याचा धोका आहे.

### आघाडीच्या एकीची चिंता...

लोकसभेत आघाडीतील पक्षांनी जशी एकी दाखवली,तशीच एकजूट विधानसभा निवडणुकीत दाखवली पाहिजे. जर एकी नाही राहिली तर आपल्याला किंमत मोजावी लागेल,असा इशारा शरद पवार यांनी शनिवारी छ.संभाजीनगर येथे पत्रकारांशी बोलताना दिला. काहीही झाले तरी जागांबाबत एकवाक्यता करावी,असेही शरद पवार म्हणाले.विधान परिषदेच्या निवडणुकीत आघाडीची मते फुटली.त्यामुळे महायुतीच्या रणनीतीची पवारांना धास्ती लागून असावी.

# अजितदादांच्या स्पष्टीकरणाने लाडक्या बहिणींनी 'सुस्कारा' टाकला...

## ओवाळणी मिळण्याचा मार्ग झाला मोकळा

**विशेष प्रतिनिधी/सोलापूर**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेविषयी जनतेत गैरसमज पसरवला जात असून अर्थ खात्याने त्यावर कुठलेही आक्षेप घेतलेले नाहीत.या योजनेसाठी निधी खर्च करायला आमचे सरकार सक्षम आहे,अशा शब्दात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अहितदादा पवार यांनी स्पष्टीकरण दिल्याने या लाडक्या बहिणींना आता ओवळणी मिळण्याचा मार्ग मोकळा ाला आहे

यंदाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पात राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना जाहीर केली आहे. त्या अंतर्गत पात्र महिलांना दर महिन्याला १,५०० रुपये दिले जाणार आहेत. राज्य सरकारद्वारे या योजनेचा प्रचार व प्रसारही केला जातो आहे. मात्र, या योजनेला खुद्द वित्त विभागाचाच



विरोध असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.त्याविषयीच्या बातम्या शनिवारी ठळकपणे प्रसिध्द झाल्या होत्या. त्यामुळे लाडक्या बहिणींमध्ये खरंच ओवाळणी मिळणार का,असा संभ्रम निर्माण झाला आहे याबाबत आता स्वत: पवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे. एक्स या समाजमाध्यावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

उपमुख्यमंत्री आणि राज्याचा अर्थ व नियोजन मंत्री म्हणून मी स्वत:च 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ही योजना राज्याच्या वर्ष २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सादर केली आहे. वित्त व नियोजन, सर्व संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतरच या योजनेची घोषणा मी राज्याच्या अर्थसंकल्पात केली,असे पवार यांनी म्हटले आहे.

### आर्थिकदृष्ट्या हे राज्य संपन्न

पवार म्हणतात की, चालू आर्थिक वर्षात योजनेसाठी आवश्यक एकूण ३५ हजार कोटी रुपयांच्या संपूर्ण रकमेची तरतूद यावर्षीच्याच अर्थसंकल्पात केली आहे. त्यामुळे या योजनेसाठी पैसा कुठून आणणार? हा प्रश्नच उद्‌भवत नाही. महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य आहे.राज्यातील माता-भगिनी-मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला या राज्यातील कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, असूच शकत नाही, असेही ते म्हणाले.काही प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या, या योजनेला वित्त विभागाचा विरोध असल्याच्या बातम्या कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी, विसंगत, राजकीय हेतूने प्रेरित आहेत. प्रसार माध्यमांनी अशा बिनबुडाच्या बातम्या देणे कृपया थांबवावे. राज्यातील कुणाचाही अशा बातम्यांवर विश्वास बसणार नाही, याची मला खात्री आहे, असेही स्पष्टीकरणही पवार यांनी दिले.

### मंत्री आदिती तटकरेंनीही दिले होते स्पष्टीकरण

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन आणि योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या निधीची पूर्तता करून ही योजना सुरू केली आहे,असे राज्याच्या महिला -बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनीही म्हटले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




एवढ्याने काय होतंय !

कल्याण

125-89-135

CMYK